SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
Estd.1962
NAAC 'A' Grade
दूरध्वनी :– 2609102, 2609103, 2609101

**संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/3718** **दि. 09 नोव्हेंबर, 2017**

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

प्रति,

1) मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2) मा. अधिविभाग प्रमुख,
सर्व विद्यापीठ अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– हिवाळी प्रथम सत्रातील शुक्रवार दि. 17 नोव्हेंबर, 2017 या दिवशी होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्वच परीक्षांचे तारखेमधील बदलाबाबत...**

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूका शुक्रवार दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजी आयोजित केल्या आहेत. निवडणूकासाठीचे मतदान विद्यापीठाशी संलग्न असलेल्या विविध महाविद्यालयांमध्ये असणाऱ्या मतदान केंद्रांवर होणार आहे. मतदान केंद्रांवर अन्य महाविद्यालयातील शिक्षकांना, प्राचार्यांना व संस्थाचालक यांना त्या त्या केंद्रावर मतदान करावे लागणार आहे. सध्या विद्यापीठाच्या तसेच महाविद्यालयांच्या प्रथम सत्राच्या परीक्षा सुरू असून विविध अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजी तिन्ही जिल्हयातील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित केल्या आहेत. निवडणूकीचे काम सुरळीत होण्यासाठी तसेच विविध घटकांना मतदान करता यावे यासाठी सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था व सर्व पदव्युत्तर अधिविभागांना आदेशानुसार दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजी सूचना विरहीत सुट्टी (Non-instructional holiday) फक्त शिक्षकांना जाहीर करण्यात आली असल्याचे जा.क्र.शिवाजी वि./सभा व निवडणूका/6657 दि. 06 नोव्हेंबर, 2017 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा पूर्णक्षमतेने सुरू झालेल्या आहेत. बी.ए., बी.कॉम. बी. एस्सी. बी.एड्. बी. टेक., एम.पी.एड्., लॉ., बी.डेस्., एम.बी.ए., एम.ए. एम.कॉम. अभियांत्रिकी व बी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या (SRPD) व पारंपारिक परीक्षा दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजीही आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकांमुळे शुक्रवार दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजी विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था करणे अडचणीचे होणार आहे. यामुळे बी.ए., बी.कॉम. बी. एस्सी. बी.एड्. बी. टेक., एम.पी.एड्., लॉ., बी.डेस्., एम.बी.ए., एम.ए. एम.कॉम. अभियांत्रिकी व बी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजी होणाऱ्या **सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा पूर्व नियोजित वेळेनुसार, रविवार दि. 26 नोव्हेंबर, 2017** रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.

तेव्हा वरीलप्रमाणे शुक्रवार दि. 17 नोव्हेंबर, 2017 रोजीचे सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे पेपर्सच्या तारखेमध्ये बदल करण्यात आला आहे. तरी सदरचा बदल सर्व संबंधित विद्यार्थी, वरिष्ठ पर्यवेक्षक व परीक्षेचे काम पहाणारे संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावा व विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत व बिनचूक पार पाडणेस सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(महेश काकडे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**टिप : वरिष्ठ पर्यवेक्षक यांनी प्रश्नपत्रिका पाकिटावरील तारखेचा बदल तात्काळ करून घेवून त्या प्रमाणे योग्य ती दक्षता घेणेची आहे. दि. 17/11/2017 चा प्रश्नपत्रिका वितरणाचा लॉट दि. 16/11/2017 रोजी वितरण होईल, याची नोंद घ्यावी.**

प्रत :

1. बी.ए./बी.कॉम/बी.एस्सी परीक्षा विभाग
2. इतर परीक्षा 1, 2, 3 व 4 परीक्षा विभाग
3. प्रश्नपत्रिका वितरण 4. मध्यवर्ती मुल्यमापन केंद्र 5. आयटी सेल

यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी